| | | |
|---|---|---|
| | **पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

---

# प्रेस नोट

दिनांक :३०/१०/२०२४

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नाशिक ग्रामीण पोलीसांची अवैध व्यवसायांविरोधात संपुर्ण जिल्हयात व्यापक स्वरूपात कारवाई

---

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून त्या पार्श्वभुमीवर नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे अवैध व्यवसायांविरोधात व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात येत आहे.

दिनांक २९ ऑक्टोबर २०२४ रोजी नाशिक ग्रामीण विभागातील पोलीस ठाणे हद्दीतील व मालेगाव विभागातील पोलीस ठाणे हद्दीतील विविध ठिकाणी अवैध देशी दारू विक्री करणारे व गावठी हातभट्टीची दारू बनविणारी ठिकाणे, त्यामध्ये डोंगर, द-या, नदी, नाले अशा अतिदुर्गम ठिकाणांवर पायपीट करून, शोध घेवून छापे टाकण्यात आले आहे.

सदर कारवाईत अवैधरित्या देशी दारू विक्री करणारे, गावठी हातभटटी दारु बनविणा-या, अवैध आमली पदार्थ वाहतुक करणा-या तसेच अवैध शस्त्रे बाळगणा-या इसमांवर कारवाई करण्यात आली असुन, नाशिक ग्रामीण जिल्हयात **४० आरोपीतांविरुध्द एकूण ४० गुन्हे** दाखल करण्यात आलेले आहेत. सदर कारवाईत **५७.७८ लिटर एकूण ३०,१८०/- रूपयचे किंमतीची देशी दारू** जप्त करण्यात आलेली आहे. तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे **रसायन १५,६०० लिटर व तयार गावठी दारु ३६८ लिटर व इतर साहित्य सामुग्री ५,८२,८००/-**, तसेच अवैध आमली पदार्थ **(गांजा) १०१.७१ किलाग्रॅम किंमत रक्कम रुपये.२०,३४,२००/-, अवैध शस्त्रांमध्ये २ गावठी पिस्तल, २ राउंड व ३ तलवारी किंमत रक्कम रुपये.५५,५००/- जप्त** करण्यात आले असुन सदर कारवाईच्या अनुषंगाने गुन्हे दाखल करण्यात आले आहे. **असा एकुण २७,०२,६८०/- रूपये** किंमतीचा मुद्देमाल नाश करण्यात आला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच अवैध व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस ठाणे निहाय वरील प्रमाणे सत्वर कारवाई करण्यात येणार आहे.